निविदा सूचना जिपउ/तां/पग डाटाएन्ट्री / १९७१/२००९,नंदुरबार  दिनांक २५/०८/२००९

---

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**,नंदुरबार यांचे कार्यालय,
कक्ष क्र.७,मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,नंदुरबार.

# निविदा प्रपत्र

**18 वी  पंचवार्षिक पशुगणना 2007नुसार**
**Detailed  house holdwise data  entry  चे काम करणेसाठी**
**निविदा**

**निविदा दाखल करणा-याचे नाव व पत्ता :------------------------------**
**-------------------------------**
**-------------------------------**

(निविदा पृष्ठ १ ते ६   )

# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे कार्यालय

## निविदा सूचना

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नंदुरबार हे खालील कामांसाठी दिनांक ०३/०९/२००९ ते २४/०९/२००९ २००९ या कालावधीत जिल्हास्तरीय डाटा एंट्री एजन्सीजकडून दोन पाकीट पध्दत अवलंबून मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

| अ.क्र | कामाचा तपशील | कामाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | नंदुरबार जिल्हयाचा १८ वी पशुगणना २००७ चा २,७९,८१५ कुटुंबांसाठी कुटुंबनिहाय डेटा www.dahd.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध Detailed Household Data Entry सॉफटवेअर मध्ये सदर वेबसाईटवर डेटा एंट्रीसाठी दिलेल्या Usermanual नुसार डेटा एंट्री करणे व त्याची XML फाईल तयार करुन सदर डेटा Email द्वारे Census@dataone.in या पत्त्यावर पाठविणे व सदर Data Entry ची CD तयार करुन देणे. | निविदा मंजुर झाल्यापासुन लवकरात लवकर परंतु तीन महिन्याचे आंत |

**निविदेचे कोरे प्रपत्र ,नियम व अटी आणि निविदेसोबत भरावयाच्या रक्कमेचा तपशील इत्यादी**

**१)** जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,कक्ष क्र.७,मघ्यवर्ती इमारत,नंदुरबार यांच्या कार्यालयात सुटटीचे दिवस सोडून दिनांक ०३/०९/२००९ ते २३/०९/२००९ पर्यंत कार्यालयीन वेळेत व दि.२४/०९/२००९ रोजी स.११.०० वाजेपर्यंत मिळू शकतील.- किंमत रुपये १०००/-(रुपये एक हजार फक्त)ना-परतावा

**२)** मोहरबंद निविदा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,कक्ष क्र.७,मघ्यवर्ती इमारत,नंदुरबार या पत्त्यावर दिनांक २४/९/२००९ अखेर दुपारी १२.०० वाजे पावेतो निविदा फार्ममधील अटीत नमूद केल्यानुसार बयाणा रक्कम रू.५०००/-(रू.पाच हजार मात्र) डीमांड ड्राफ्ट सह जमा करण्यात यावी. विहीत वेळेनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**३)** प्राप्त निविदा दिनांक २४/०९/२००९ रोजी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त , नंदुरबार यांचे कार्यालयात दुपारी १४.०० वाजता समिती समोर उघडण्यात येतील.

**४)** एखादी अगर सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार निविदा समितीने राखून ठेवलाआहे.

**(डॉ.एस.बी.तटवर्ती )**
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**
**नंदुरबार**

जा.क.जिपउ/तां/पग डाटाएन्ट्री / १९७१/२००९,नंदुरबार
दिनांक २५/०८/२००९

# <u>डाटा एंट्री निविदेचे नियम व अटी</u>

१. डाटा एंट्री एजन्सी/ कंपनी नोंदणीकृत असल्या बाबतचे प्रमाणपत्र सादर करण्यांत यावे. निविदा अर्ज ज्या नांवाने खरेदी केला असेल त्याच नावाने निविदा भरावी.

२. निविदेसोबत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा रुपये 5000/-(अक्षरी रुपये पाच हजार फक्त) इतक्या रकमेचा Uncrossed डिमांड ड्राफ्ट बयाणा रक्कम म्हणुन सादर करण्यांत यावा.

३. डाटा एंट्री एजन्सीने मागील तीन वर्षाची आयकर विवरणपत्रे, ताळेबंद पत्रकासह (Balancesheet) निविदे सोबत सादर करावयाची आहेत. (नव्याने सुरु झालेल्या एजन्सी यांना ही अट शिथिलक्षम राहील.)

४. www.dahd.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध सॉप-टवेअर मध्ये त्याच वेबसाईटवर उपलब्ध सॉप-टवेअर मध्ये त्या वेंबसाइटवर दिलेल्या User s Manual मधील सूचनांनुसार करावयाच्या आहे.

५. निविदांची सर्व पाकिटे (लिफाफा क्रमांक 1, लिफाफा क्रमांक 2, आणि सदर दोन्ही लिफाफे ज्या पाकिटात टाकले आहे ते मोठे पाकिट ) सिलबंद (मोहोरबंद) असावेत. मोठया पाकिटावर सर्वात वरच्या बाजुस मध्यभागी **18 वी पशुगणना 2007 Detailed householdwise data entry चे काम करणेसाठी निविदा** असे ठळक अक्षरात लिहावे , तर लिफाफा क्रमांक 1वर **तांत्रिक लिफाफा आणि** लिफाफा क्रमांक 2 वर **व्यापारी लिफाफा** असे संबंधित पाकिटांवर नमुद करावे. तसेच तीनही पाकिटांवर :-

अ) प्रति , जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
कक्ष क्र.7,मध्यवर्ती इमारत,नंदुरबार असे आणि

ब) निविदा सादर करणा-या डाटा एंट्री एजन्सी/ कंपनीचे नांव , पत्ता व दिनांक ठळक अक्षरात डाव्या बाजुला खाली कोप-यामध्ये लिहावे.

६. तांत्रिक लिफाफामध्ये (लिफाफा क्रमांक 1 ) सर्व कागदपत्रे , बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट इ.सादर करावीत. व्यापारी लिफाफा मध्ये ( लिफाफा क्रमांक 2)फक्त **Detailed householdwise data entry चे प्रती कुटुंबाचे दर (सोबत दिलेल्या प्रपत्रात)** सादर करावेत

७. डाटा एंट्रीचे काम सोयीनुसार जिल्हास्तरावर अगर तालुकास्तरावर करावयाचे राहील.

८. डाटा एंट्रीचे काम गट पशुधन विकास अधिकारी पुरवतील त्या प्रपत्र-१ व प्रपत्र-३ मधील नोंदीनुसारच सर्व रकान्यातीलआकडेवारीची डाटा एंट्री (Part-I-Livestock, Part-II- Poultry, Part-III Agricultural Implements and Equipments & Part IV-Fisheries ) करावयाची राहील व तसे करणेबाबत लेखी हमी पत्र निविदाकारांनी देणे आवश्यक आहे. (हमी पत्र सोबत जोडले आहे तेच भरुन सही करुन सादर करणे आवश्यक आहे ) (सुमारे 279815 इतक्या कुटुंबांसाठी एंट्रीज करावयाच्या आहेत. प्रपत्र 3 चा 49 पानी नमुना सोबत जोडला आहे.) प्रत्यक्ष डाटा एंन्ट्री करतांना प्रपत्र 3 मधील रकाना क्र. -2 मधील नोंदविलेले कुटुंब प्रमुखाचे नाव नोंदवू नये फक्त

अनुक्रमांक नोंदवावा आणि प्रत्येक कुटुंबाची रकाना क्र.-3 पासून पुढे असलेल्या सर्व रकान्यांमधील भरलेली आकडेवारीची डाटा एंन्ट्री करावयाची आहे.

९. सदर काम मिळाल्यापासुन लवकरात लवकर परंतु जास्तीत जास्त तीन महिन्यांचे आंत एजन्सीने पुर्ण करावयाचे राहील.

१०. Detailed Data Entry Software हे www.dahd.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ते निविदाकारांनी डाऊनलोड करुन घ्यावयाचे आहे. या वेबसाईटवर Detailed Householdwise Data Entry बाबत उपलब्ध User s Manual मधील सूचनांनुसार Data Entry चे काम करणे आवश्यक राहील.

११. डाटा एंन्ट्री एजन्सीकडे एक Server- window xp/window 2000(4 GB ram ) अत्याधुनिक व अगदी अलिकडे अदयावत केलेले Antivirus Software, Internet, LAN connectivity अंतर्गत जोडणी असणे आवश्यक आहे. सदर सुविधा असल्याबाबतचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच किमान आवश्यक किंवा त्यापेक्षा अत्याधुनिक Configuration असलेले Client Computers असणे आवश्यक आहे. जेणेकरुन डाटा एंट्रीचे काम दिलेल्या वेळेत पुर्ण होऊ शकेल.

१२. Detailed Household डाटा एंट्री सॉप-टवेअरमध्ये कोणतेही प्रकारची अडचण आल्यास एजन्सीने श्री. संजय शर्मा -Scientist D, NIC यांच्या Office Phone No. 011-23388630 व Mobile No. 09891989219 वर अथवा स्थानिक NIC कार्यालयाशी संपर्क साधणे आवश्यक राहील.

१३. NIC नवी दिल्ली यांनी डाटा एंट्री सॉप-टवेअर मध्ये किरकोळ बदल केल्यास व तसे केल्याचे वेबसाईटवर दिसून आल्यास डाटा एंट्री एजन्सीने त्या बदलानुसारच डाटा एंट्री करावयाची राहील . **सदर सॉप-टवेअर हे NIC च्या मालकिचे आहे. त्यामध्ये परस्पर कोणताही बदल करण्यांत येऊ नये.** त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केल्यास एजन्सीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१४. डाटा एंट्री एजन्सीला सदर काम करणेसाठी आवश्यक प्रपत्र -1व प्रपत्र -3 मध्ये माहिती संबंधीत तालूक्याचे गट पशुधन विकास अधिकारी (पंचायत समिती) यांचे कडून पुरविण्यात येईल व संबंधित जाणकार अधिकारी /कर्मचारी उपलब्धही राहतील.

१५. डाटा एंट्री चे नियमित बॅकअप घेणे एजन्सीला बंधनकारक आहे.

१६. सदर कामासाठी एजन्सीला कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१७. निविदा मंजुरीचे पत्र प्राप्त झाल्याच्या सात दिवसांचे आंत डाटा एंन्ट्री एजन्सीने निविदे मध्ये प्रस्तावित केलेल्या दरानुसार डाटा एंट्रीच्या अपेक्षित मोबदल्याच्या एकुण रकमेचे 3 टक्के एवढी रक्कम जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार यांना उद्द्ेशुन राष्ट्रीयकृत बँकेच्या बँक गॅरंटी स्वरुपात अथवा टी.डी.आर. स्वरुपात निविदा धारकांने या कार्यालयाता जमा करणे आवश्यक राहील. (अनामत रक्कम

निविदा कालावधी संपल्यानंतर पुढे सहा महिन्यांपर्यंत परत केली जाणार नाही.) त्याच सोबत रुपये 100/- च्या स्टँपपेपरवर निविदा धारकाने विहीत नमुन्यात करारपत्र करुन दयावे लागेल.

१८. एजंन्सीने केलेल्या कामाची गुणवत्ता NIC नवी दिल्ली यांचेकडून तपासणी झाल्यावर देय मोबदल्याच्या एकूण रकमेच्या 75 टक्के इतकी रक्कम अदा करण्यात येईल व उर्वरित 25 टक्के रक्कम ही NIC नवी दिल्ली यांच्या मान्यते नंतर अदा करण्यात येईल.

१९. डाटा एंट्रीचे काम दिलेल्या एजन्सीला देय मोंबदल्याच्या रकमेतुन नियमानुसार आयकर कपात केला जाईल व त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र संबंधित एजन्सीला या कार्यालयामार्फत देण्यांत येईल.

२० निविदा मंजुर झालेल्या निविदा धारकाने विहीत मुदतीत सुरक्षा रक्कम न भरल्यास व करारनामा करुन न दिल्यास अशा वेळी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नंदुरबार हे इतर योग्य निविदा धारकासोबत करार करण्यास मुक्त राहतील. अशा वेळी निविदेसोबत सादर केलेली बयाणा रक्कम रुपये 5000/- जप्त करण्यांत येईल.

२१. एजन्सीने काम अर्धवट सोडल्यास सदर एजन्सीला त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला दिला जाणार नाही. तर 3 टक्केची सुरक्षा रक्कमही जप्त करण्यांत येईल.

२२. लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक लिफाफा) मधील सर्व बाबींची शहानिशा करुन लिफाफा क्रमांक २ (व्यापारी लिफाफा) मध्ये नमुद केलेले डाटा एंट्रीचे स्पर्धात्मक दर मंजुर/ना-मंजुर करण्याचा हक्क निविदा निवड समिती यांनी राखुन ठेवलेला आहे.

२३. हया कामासाठी काढण्यांत आलेली निविदा सुचना मधील बाबींचे समावेश या निविदेचा अटी शर्तो मध्ये गृहीत धरावे.

२४. निविदा सोबत सादर करण्यांत येणा-या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित केलेल्या असाव्यात.

२५. दरपत्रकामध्ये नमुद केलेले दरामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड केलेली नसावी.

लिफाफा क्र.-१ मध्ये

**निविदा संबंधी शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे**

**निविदाधारकाचे प्रमाणपत्र**

१. मी/आम्ही १. स्वतःचे नांव - ------------------------------------------------------

२. एजन्सीचे नांव -------------------------------------------------------

या एजन्सीचे प्रतिनिधी/अधिकृत स्वाक्षरीकर्ता असून जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ------- जिल्हा यांच्याकडे सन २००९ करिता १८वी पशुगणना २००७ अंतर्गत सवविस्तर डाटा एंट्रीसाठी (Detailed Householdwise Data Entry) निविदा सादर करित आहे/आहोत.

१.मी/आम्ही निविदा अर्जासोबत प्राप्त झालेल्या निवीदा संबंधी सर्व शर्ती व अटी बंधनकारक आहे याची मला/आम्हाला जाणीव आहे

२. मी/आम्ही एजंसीतर्फे सादर केलेली माहिती खरी व बरोबर असून जर ती एखादेवेळी तपासणीमध्ये खोटी अथवा चुकीची आढल्यास निविदा नामंजूर होण्याव्यतिरिक्त कायद्यानुसार होणा-या कारवाईस मी/आम्ही पात्र राहू याची मला/आम्हाला जाणीव आहे.

निविदासंबधीच्या कोणत्याही वादासाठी जिल्हा न्यायालय हेच कार्यालयीन कार्यक्षेत्र राहील. मी/आम्ही असे नमुद करतो की, १८वी पशुगणना २००७ सविस्तर डेटाएंट्रीसाठीच्या सर्व शर्ती व अटी मी/आम्ही काळजीपूर्वक वाचले असून त्या मला/आम्हाला सर्वतोपरी मान्य आहेत. तसेच त्या मला/आम्हाला बंधनकारक आहेत याची मला/आम्हाला जाणीव आहे

ठिकाण :

दिनांक : / /२००९

**निविदाधारकाची संपूर्णस्वाक्षरी**
**शिक्क्यासह एंजसीचे नांव व पत्ता**

## निविदा धारकाने द्यावयाचे हमीपत्र

मी / आम्ही ------------------------------------------------------------------------------ -------------- (एजन्सीचे / निविदा धारकाचे नाव व पत्ता )या हमीपत्राद्वारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, धुळे यांना हमी देत आहे / आहोत की, आमची निविदा स्विकृत झाल्यास पशुसंवर्धन विभाग, नंदुरबार यांचे अधिकृत अधिकारी / कर्मचारी यांचे मार्फत Detailed Householdwise Data Entry साठी १८ वी पशुगणना २००७ च्या आम्हाला पुरविण्यात येणा-या प्रपत्र -३ मधील सर्व रकान्यातील

Part-I-Livestock,

Part-II- Poultry,

Part-III Agricultural Implements and Equipments

Part IV-Fisheries बाबत आकडेवारीची N I C नवी दिल्ली या संस्थेच्या सदर कामाबाबतच्या सॉप-टवेअर मध्ये त्या सॉप-टवेअर सोबतच्या User`s Manual मधील सूचनांनुसार डाटा एंन्ट्री करुन देण्यास बांधील राहू.

**दिनांक :** **निविदा धारकाची स्वाक्षरी**

**ठिकाण :** **नाव व शिक्का**